**फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ कन्हैयालाल माणिकचंद चोपडा यांचा शपथेवर पुढील सरतपास त्यांचे वकील श्री.एच.आर. शेलोत यांचेमार्फत :**

०४.    मी या प्रकरणात निशाणी क्र.०५ वर माझे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही देखील आहे. तसेच मी या प्रकरणात निशाणी क्र.०३ सोबत कागदपत्रे दाखल केलेली आहे.

आता मला दि.११/०९/२०२३ रोजीचा मुळ धनादेश दाखविण्यात आला. त्यावर आरोपीची सही असून ती सही मी ओळखतो. त्यास **नि.क्र.२९** देण्यात आला. सदरचा धनादेश आम्ही वटण्याकामी एच.डी.एफ.सी., शाखा–अहमदनगर येथे जमा केला असता तो न वटता परत आला. त्याबाबतचा बॅकेचा दि.१३/०९/२०२३ रोजीचा मेमो मी या प्रकरणात दाखल केलेला आहे. त्यास **नि.क्र.३०** देण्यात येतो. सदरचा धनादेश न वटल्याकरणाने आम्ही आरोपीला आमच्या वकीलांमार्फत नोटीस पाठविलेली होती. आता मला सदर नोटीसीची स्थळप्रत दाखविण्यात आली. ती तीच असून त्यावर माझे वकीलांची सही आहे. त्यास **नि.क्र.३१** देण्यात येतो. तसेच सदरची नोटीस पाठविल्याबाबतची पोस्टाची पावती मी या प्रकरणात दाखल केलेली आहे. त्यास **नि.क्र.३२** देण्यात येतो. आरोपीला नोटीस मिळाल्याबाबतचा ट्रॅक रिपोर्ट मी दाखल केलेला आहे. तसेच आरोपीला नोटीस मिळाल्याबाबतची माहिती मिळाली म्हणुन मी पोस्ट खात्याला दिलेल्या पत्राची स्थळप्रत दाखल केलेली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३३** देण्यात येतो. सदरची नोटीस आरोपीला मिळाल्याबाबतची माहिती पोस्ट खात्याने मला त्यांचे दि.१४/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये दिली होती. तसेच मी या प्रकरणात योगिराज कॅटल फिडस् या फर्मचे दि.०१/०४/२०२२ ते दि.२५/०९/२०२३ पर्यंतचा खातेउतारा दाखल केलेला आहे व त्यासोबत भारतीय पुरावा कायदा कलम ६५ब अंतर्गत प्रमाणपत्र देखील मी दाखल केलेला आहे. त्यास एकत्रितरित्या **नि.क्र.३४** देण्यात येतो.

सरतपास पुर्ण.

SACHIN RAJARAM SHINDE
Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.11.20 12:27:51 +0530

**आरोपी व त्यांचे वकील पुकारले असता गैरहजर. तसेच नि.क्र.२८ वरील आदेशान्वये प्रकरण आरोपीचे गैरहजेरीत चालविण्यात येत असल्याने उलटतपास नाही.**

(न्यायालयात साक्षीदारासमक्ष असणा–या स्क्रीनवर साक्षीदाराचा संपुर्ण जबाब हा साक्षीदाराला वाचुन दाखविण्यात आला व त्याने त्याबाबतची काहीही तक्रार नसल्याचे त्यांचे वकीलांसमक्ष तोंडी सांगितले.)

माझे समक्ष जबाब श्रवणोत्तर स्वीकृत,

SACHIN RAJARAM SHINDE

Digitally signed by SACHIN RAJARAM SHINDE
DN: cn=SACHIN RAJARAM SHINDE, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6949745, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2025.11.20 12:27:57 +0530

**(एस.आर. शिंदे)**

**दि.२०/११/२०२५**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१८, अहमदनगर.